# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. ५५ / २०२३

**विषय :-** दि.१४.०६.२००६ पूर्वी विहित निवड समितीमार्फत नियुक्त व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या एम्.फिल. अर्हताधारक अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव सादर करणेबाबत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ५ सप्टेंबर, २००९ रोजीच्या पत्रान्वये दि. १४ जून, २००६ पूर्वी एम्.फिल. अर्हतेवर विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त झालेल्या व ज्या अर्हताधारकांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे तसेच ज्यांनी सेवेत असताना दि. १ जानेवारी, १९९४ ते दि. ११ जुलै, २००९ या कालावधीत एम्.फिल. ही अर्हता धारण केली आहे, अशा अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करावयाचे आहेत.

तरी दि. १४ जून, २००६ पूर्वी विहित निवड समितीद्वारे नियुक्त एम्.फिल. अर्हताधारक अध्यापक ज्यांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे तसेच ज्यांनी सेवेत असताना दि. १ जानेवारी, १९९४ ते दि. ११ जुलै, २००९ या कालावधीत एम्.फिल. ही अर्हता धारण केली आहे व ज्यांना नेट अर्हतेतून अद्याप विद्यापीठ अनुदान आयोगाने सूट दिलेली नाही अशा अध्यापकांचे प्रस्ताव दि. २९ एप्रिल, २०२३ पर्यंत विद्यापीठातील शैक्षणिक विभागाच्या मान्यता कक्षाकडे सादर करावेत.

सदर प्रस्तावासोबत संबंधित अध्यापकांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावीत.

१) मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून प्राप्त झालेली पद मान्यता.
२) बिंदू नामावली
३) जाहिरात
४) निवड समिती अहवाल
५) नियुक्ती आदेश
६) रूजू अहवाल
७) शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे. (उदा. पदवी, पदव्युत्तर पदवी, एम्.फिल. गुणपत्रिका व पदवी इ.)
८) शिक्षक मान्यता प्रत

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी वरील सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, प्रत्येक अध्यापकाचा स्वतंत्र प्रस्ताव याप्रमाणे विहित वेळेत सादर करावा.

गणेशखिंड, पुणे - ४११००७ )
जावक क्र. सीसीओ/ 1057 )
दिनांक : 17 एप्रिल, २०२३ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव, शिक्षक मान्यता कक्ष

प्रत : मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये.